माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ४३७/२०२१**

**अपिलार्थी, श्री. सदानंद एस. गणवीर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक),**
पवनी, पो. पवनी, ता. रामटेक, जि. नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास-१),**
नागपूर वनविभाग रामटेक, ता. रामटेक जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.११.२०२२**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २०.१०.२०२० | २७.१०.२०२० | ०६.११.२०२० | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २०.१०.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) १ एप्रिल २०२० पासून ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीत उपवनसंरक्षक वनविभाग नागपूर कार्यालयाकडून एकूण प्राप्त धनादेशाच्या रक्कमा कशा खर्ची घातल्या त्या रोखलेखा पुस्तीकेची सविस्तर माहिती व त्याचे बिल व बिलाचे व्हाऊचरची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलब्ध करुन देण्यात यावी. २) १ एप्रिल २०२० पासून ते ३० सप्टेंबर २०२० या कालावधीत आपल्या रेंज कार्यालयाने उपवनसंरक्षक वनविभाग नागपूर कार्यालयाकडून एकूण प्राप्त रक्कमेची माहिती जसे RTGS चा नंबर त्यावरील रक्कम व त्याचा दिनांक व बँकेच्या नावाची माहिती साक्षांकित छायाप्रतीत उपलबध करुन देण्यात यावी " इ. २ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.१०.२०२० रोजीच्या पत्रान्वये, मुद्दा क्र. १ व २ च्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या माहितीची एकूण ३२५/- रुपये अपिलार्थीस भरण्याबाबत कळविले आहे. सदर शुल्काचा भरणा न करता अपिलार्थी यांनी **दिनांक ०६.११.२०२० रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "जोडपत्र-अ चे अवलोकन न करता सरळरित्या २५०/- रु. भरणा करण्यास कळविल्याने माहिती अप्राप्त " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे दिसून येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०२.२०२१ रोजी** " सरळरित्या ८५०/- रुपये कळविल्याने माहिती अप्राप्त असल्याने व सुनावणी झाली मात्र कोणताही आदेश प्राप्त नाही" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक १५.११.२०२२ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक), श्री.डी.बी. वाघ व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, श्री. हरविर सिंग उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७.१०.२०२० रोजी अपिलार्थीस विहीत शुल्काचा भरणा करण्यास कळविले आहे. त्याविरुध्द दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केलेले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कलम १९(६) अन्वये जास्तीत जास्त ४५ दिवसाच्या आत सुनावणी घेवून सविस्तर आदेश पारीत करणे अपेक्षित आहे. या प्रकरणात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून असे आदेश पारीत करण्यात आलेले नाही, असे प्रथमदर्शनी आढळून येते. त्यामुळे सदर प्रकरणी कलम १९(६) चा भंग होत आहे. त्यामुळे त्यांचेवर कलम १९ (८) (ग) व २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये, याचा सुस्पष्ट लेखी खुलासा त्यांनी आयोगास दिनांक ०६.०६.२०२३ रोजी व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करावा. सदर आदेशाची प्रत तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांना पोहचेल याबाबतची विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खातरजमा करावी.

तसेच अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संकलित केलेली माहिती अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी. तसेच प्रथम अपील अर्जावर सुनावणी न झाल्यामुळे अपिलार्थीस कलम १९(८)(ख) नुसार नुकसान भरपाई का देण्यात येवू नये, यांचाही खुलासा तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०६.०६.२०२३ रोजी आयोगास सादर करावा.

**अंतरिम आदेश**

उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा स्वंयस्पष्ट खुलासा आयोगास दिनांक ०६.०६.२०२३ रोजी व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करावा. तसेच अपिलार्थीस माहिती दिल्याची पोहच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दिनांक ०६.०६.२०२३ रोजी व्यक्तीशः उपस्थित राहून सादर करावी.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १५.११.२०२२**

जावक क्रमांक 2730 दिनांक

4 MAY 2023